दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २३२ वा शनिवार दि.०८ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# एचएसआरपी नंबर प्लेटचे दर वाजवी



मुंबई : सर्व स्वयंचलित वाहनांसाठी अनिवार्य करण्यात आलेल्या एचएसआरपी नंबरप्लेटच्या किमती इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याचा दावा करण्यात येत आहे. दरम्यान, आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळामध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा करताना एचएसआरपी नंबर प्लेटच्या दरांबाबतची आकडेवारी सभागृहात मांडली. तसेच महाराष्ट्रामध्ये एचएसआरपी नंबर प्लेटचे दर वाजवी असल्याचे सांगितले. देशात सर्वात महाग एचएसआरपी नंबरप्लेट महाराष्ट्रात विकल्या जात आहेत, असा एचएसआरपी नंबरप्लेटबाबत एक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न झाला. खरंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे याची अंमलबजावणी आपल्याला आधीच करायची होती. दरम्यान, या एचएसआरपी नंबरप्लेटच्या अंमलबजावणीबाबत आपण मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. त्यांनी इतर सदस्यांसोबत मिळून या नंबर प्लेटबाबत जे काही दर आले होते. त्याचे मूल्यमापन करून अंतिम दर निश्चित केले आहेत. यासंदर्भात आपण पाहिले तर काही राज्यांनी फिटमेंट चार्जेस आणि प्लेट चार्जेस हे वेगवेगळे दाखवले आहेत. महाराष्ट्रामध्ये आपण हे सर्व एकत्र केले आहे. विविध राज्यांतील दुचाकींसाठीच्या एचएसआरपी नंबर प्लेटचे दर पाहिले तर ते ४२० ते ४८० दरम्यान आहेत. महाराष्ट्रामध्ये हे दर ४५० रुपये आहेत. तर तीन चाकींसाठी सर्व राज्यांमध्ये ४५० ते ५५० रुपये दर आहे, तर महाराष्ट्रामध्ये हेच दर ५०० रुपये आहेत. चारचाकींसाठी सरासरी ८०० रुपये दर आहे. तर महाराष्ट्रामध्ये ते ७५० रुपये आहेत. जड वाहनांसाठी ६९० ते ८०० तर आपल्याकडे हा दर ७४५ रुपये आहे. पुरावा म्हणून मी मुद्दाम इतर राज्यांमधील पावत्या घेऊन आलो आहे, असे सांगत देवेंद्र फडणवीसांनी एचएसआरपी नंबर प्लेटबाबत करण्यात येत असलेले दावे फेटाळून लावले आहेत. सभागृहात आकडेवारीची तुलना देवेंद्र फडवणीस पुढे म्हणाले की, आता आपण एचएसआरपी नंबर प्लेटबाबत आपण गोव्याचा विचार केला तर त्यांनी मूळ किंमत ३१५ रुपये, फिटमेंट किंमत १०० रुपये, कन्व्हेयन्स फी ५० रुपये, जीएसटी ८३ रुपये, असं केलं तर त्यांची किंमत ५४८ रुपये एवढी होते. चंडीगडचीही जवळपास ५४९ रुपये एवढी किंमत होते. तर महाराष्ट्राची एकूण किंमत पाहिली तर ती ५३१ रुपये एवढी होते. त्यामुळे महाराष्ट्रात एचएसआरपी नंबरप्लेटसाठी अवाजवी किंमत आकारली जात आहे

## भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या केज तालुकाध्यक्षपदी अक्षय वाघमारे यांची निवड



केज/प्रतिनिधी भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या केज तालुकाध्यक्षपदी अक्षय वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे . अक्षय वाघमारे हे गेल्या अनेक वर्षापासून दलित चळवळीसह सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर आहेत. त्यांच्या कार्याची भीमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे साहेब यांनी दखल घेऊन भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा चंद्रकांत खरात सर यांच्या शिफारशीवरून हंडोरे साहेब यांच्या आदेशावरून अक्षय वाघमारे यांची केज तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडिचे पत्र जिल्हाध्यक्ष डॉ.आमरेंद्र विद्यासागर, भिमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक प्रा. चंद्रकांत खरात सर,बीड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख सुनिल धिमधिमे, काँग्रेस मागासवर्ग प्रवर्गाचे प्रदेश उपाध्यक्ष राहुल वाव्हळे, संघटनेचे तालुका उपाध्यक्ष अशोक सरवदे यांच्या हस्ते देण्यात आले या वेळी भिमशक्ती संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते, यावेळी प्रा. चंद्रकांत खरात सर यांनी खा. चंद्रकांत हांडोरे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी संघटना वाढीसाठी कार्य करण्यासाठी अक्षय वाघमारे यांची निवड करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, यावेळी बोलताना अक्षय वाघमारे म्हणाले की, संस्थापक तथा राज्य खासदार हंडोरे साहेब व पक्षाच्या सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून मला केज तालुक्यातील वंचित बहुजन घटकातील सर्वसाधारण नागरिकांच्या आणि अडचणी सोडवण्यासाठी माझ्यावर जी जबाबदारी दिली ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून पक्ष संघटना वाढीसाठी सदैव प्रयत्नशील राहून संघटनेचे काम प्रामाणिक पणे करेल असे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले आहे. भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या केज तालुकाध्यक्षपदी अक्षय वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## माणूस पैशाने श्रीमंत होऊ शकतो मात्र अध्यात्माशिवाय सुखशांती लाभत नाही रेणापूरच्या बालाजी मंदिर सप्ताह सांगता सोहळ्यात ऋषिकेशदादा कराड



लातूर : – कोरोना काळात कितीही पैसा असला तरी उपयोग झाला नाही. माणूस पैशाने श्रीमंत होऊ शकतो मात्र अध्यात्माशिवाय सुखशांती, समाधान लाभत नाही. प्रत्येक अध्यात्मिक, धार्मिक कार्यात महिलांचा मोठा सहभाग आहे. आज केवळ महिलामुळेच अध्यात्मिक क्षेत्र टिकून आहे येणाऱ्या पिढीचा अध्यात्मात सहभाग वाढावा यासाठी महिलांनीच पुढाकार घ्यावा असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर येथील श्री बालाजी व ज्ञानेश्वर मंदिर परिसरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ गेल्या २८ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान झाला. या सप्ताहात दररोज हभप श्री १००८ स्वामी चैतन्यजी महाराज यांची भागवत कथा झाली. कथेबरोबरच पारायण, गाथा भजन यासह विविध धार्मिक कार्यक्रम झाले. आज ७ मार्च शुक्रवार रोजी हभप जगन्नाथ महाराज देशमुख पंढरपूरकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. या सांगता सोहळ्यास भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव तथा युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड आवर्जून उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी हभप जगन्नाथ महाराज देशमुख पंढरपूरकर यांचा पांडुरंगाची मूर्ती भेट देऊन यथोचित सन्मान केला. बालाजी मंदिर परिसरात भव्य सभागृह बांधकामासाठी भाजपाचे नेते आमदार रमेशआप्पा कराड यांनी एक कोटी रुपयांचा निधी मिळवून दिल्याबद्दल युवा नेते ऋषिकेशदादा कराड आणि या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांचा मंदिर ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सर्वत्र अध्यात्मिक धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होत आहेत. अशा कार्यक्रमामुळेच गावागावात एकोप्याचे वातावरण निर्माण होण्यास मदत होते. विज्ञानाला अध्यात्माची जोड दिल्यानेच सर्वांगीण प्रगती होत असल्याचे सांगून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, आमदार रमेशआप्पा कराड यांनी भाविकांची गरज लक्षात घेऊन एक कोटी रुपयाचा निधी उपलब्ध केला. या निधीतून येत्या काळात भव्य सभागृहाची उभारणी होईल आणि पुढील अखंड हरिनाम सप्ताहाचे २५ वे रोप्य महोत्सवी वर्ष त्याच सभागृहात आपण साजरे करू असे सांगून या सभागृहासाठी गरज पडल्यास आणखी निधी उपलब्ध व्हावा यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

सप्ताहात हभप गणेश महाराज निरपणा, हभप सुधीर महाराज होळीकर, हभप पांडुरंग महाराज कोकाटे, हभप शिवाजी महाराज मुळे, हभप महारुद्र महाराज खाडे, हभप भगवान महाराज महाळंगीकर, हभप उद्धव महाराज रमजानपूरकर यांची कीर्तने झाली. काल्याच्या कीर्तनानंतर हजारो महिला पुरुष भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सांगता सोहळ्यास महिला भगिनींची मोठी गर्दी होती. यावेळी अभिषेक आकनगिरे, युवराज पाटील, लक्ष्मण कातळे, जगन्नाथ माळी, चंद्रकांत कातळे, दत्ता सरवदे, महेश गाडे, धोंडीराम पांचाळ, प्रल्हाद कातळे, दिनकर राठोड, बिबीषन आळंदकर, अच्युत कातळे, संतोष राठोड, उज्वल कांबळे, पदम पाटील, रमा चव्हाण, सतीश काकडे, संतोष पाटील, वैजू कातळे, बालाजी गाडे, भागवत पाटील, जगन्नाथ गाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर महिला पुरुष तरुण भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्त करा या मागणीसाठी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने केज तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन




केज/प्रतिनिधी बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्त करा या मागणीसाठी बीड जिल्ह्यातील केज येथील भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा व समविचारी संघटणेकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकातून रॅली काढून महामहीम राष्ट्रपती, मा. प्रधानमंत्री व मा.मुख्यमंत्री नितीशकुमारजी बिहार राज्य यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.बुद्धगया येथील महाबोधी महाविहार आंदोलनाच्या समर्थनार्थ केज शहरातील बौद्ध उपासक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये एकत्रित जमून नंतर तहसील कार्यालय मध्ये पोहोचले. तथागत भगवान बुद्धांचे ज्ञानप्राप्ती स्थळ अर्थात विश्वभरातील बौद्धांचे परम पवित्र स्थान महाबोधी महाविहार (बोधगया बिहार राज्य) चे पूर्ण नियंत्रण बौद्धांकडे सोपविणे तसेच बोधगया मंदिर अधिनियम १९४९ (बी.टी.ऍक्ट १९४९),रद्द करावा या प्रमुख मागण्यांसाठी ऑल इंडिया फोरम बुद्धिस्ट,सोसायटी ऑफ इंडिया,समता सैनिक दल तसेच अन्य अनेक सामाजिक संघटना द्वारा पाटणा बिहार येथे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ पासून आंदोलन सुरू आहे या आंदोलनानुसार दि.१२ फेब्रुवारी २०२५ पासून बिहार राज्यातील बोधगया महाबोधी महावीराच्या समोर ऑल इंडिया फोरमच्या वतीने आमरण उपोषण/धरणे आंदोलन सुरू आहे.

या सर्व आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी केज शहर व तालुक्यातील बौद्ध बांधव तहसील कार्यालय येथे उपस्थित होते. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे शहरध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके व शहर सरचिटणीस जयपाल मस्के यांनी उपस्थितांना आंदोलनाची पार्श्वभूमी सांगितली.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे बालासाहेब जोगदंड, चंद्रकांत मस्के,बाबा पोटभरे, भैय्यासाहेब आरकडे, तात्या गवळी, लखन हजारे, विवेक बनसोड, किरण जोगदंड,राहुल इनकर,संघपाल मस्के,संगपाल वाघमारे,सुरेश बचुटे, चंद्रकांत खरात,योगेशभाई गायकवाड,राहुल वाव्हळे, अक्षय वाघमारे यांच्यासह विविध संघटनेचे,पक्षाचे विविध क्षेत्रातील मान्यवर व समाज बांधव उपस्थित होते.

## अंबाडी घाटात वाटसरूंना झाले पट्टेदार वाघाचे दर्शन



किनवट: शेख शौकत :–किनवट तालुक्याच्या अंबाडी घाटात पट्टेदार वाघाचा मुक्त संचार असून तो वाघ अधूनमधून किनवट, मांडवी रस्त्याने प्रवास करणाऱ्यांच्या दृष्टिपथात पडत आहे. मंगळवारी सायंकाळी या मार्गाने कारने जाणाऱ्या प्रवाशांना अंबाडी या जंगल घाट क्षेत्रात पट्टेदार वाघ एका रोह्याचा मागे धावताना आढळून आला. येथील दत्ता आडे व पंकज माडपेल्लीवार हे आदिलाबाद येथे एका कार्यक्रमाला जात असताना रस्त्यावर त्यावर अचानक एक पट्टेदार वाघ रोह्याचा पिच्छा करत होता. कारच्या लाईटने वाघाचे डोळे दिपले. त्यामुळे वाघ रस्त्यावर थांबला. अन् रोही वाघाच्या तावडीतून आपला जीव वाचवून जंगलात निघून गेला; पण रस्त्यावरून वाघ काही केल्या हटत नव्हता.


किनवट तालुक्यातील घनदाट जंगलामुळे जंगल असो शेतात कधीकधी रस्त्यात वन्यप्राण्याचे दर्शन होतात शेतकऱ्याच्या शेतात असो रस्त्यात वाघ बिबट्या अस्वल रानडुक्कर हे वन्यप्राणी नेहमीच दिसतात.

## दयानंद विधी महाविद्यालयात न्यायमूर्ती प्रसन्ना भालचंद्र वराळे यांच्या सन्मानार्थ गौरव सोहळा.



लातूर :– दयानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित दयानंद विधी महाविद्यालय, लातूर; लातूर जिल्हा वकिल मंडळ आणि दयानंद विधी महाविद्यालय माजी विद्यार्थी संघाच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. दयानंद सभागृह, लातूर येथे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्ना भालचंद्र वराळे यांच्या सन्मानार्थ गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसन्ना वराळे हे दयानंद विधी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून १९८५ ला कायद्याची पदवी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी यापूर्वी मुंबई उच्च न्यायालय तथा कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला आहे. त्यांच्या सर्वोच्च न्यायालयातील नियुक्तीमुळे महाविद्यालयाचा गौरव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर, दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांच्या सन्मानार्थ या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २५ जानेवारी २०२५ ला त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात स्वकर्तृत्वाने भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या न्यायक्षेत्रातील उल्लेखनीय व यशस्वी वाटचालीचा आणि कार्याचा गौरव करण्यासाठी प्रस्तुत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी अनेक नामवंत विधीज्ञ, न्यायाधीश, प्राध्यापक, माजी विद्यार्थी, सन्माननीय पत्रकार आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विधी क्षेत्रातील सर्व अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन दयानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, दयानंद माजी विद्यार्थी संघ व लातूर जिल्हा वकिल मंडळ यांनी केले आहे.

## केज,अंबाजोगाई,परळी येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आढावा बैठक संपन्न



केज/प्रतिनिधी केज,परळी,अंबाजोगाई येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड जिल्हा संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांच्या उपस्थितीत आढावा बैठका संपन्न झाली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून संपर्कनेते सूनीलजी प्रभू, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथजी नेरुळकर,उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हा संपर्क प्रमुख मा. परशुराम जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती तर लोकसभाप्रमुख मा.आ. सुनीलजी धांडे यांच्या उपस्थितीत तसेच बीड जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना महिला आघाडी युवासेना संवाद आढावा बैठका संपन्न झाल्या.

सदरील बैठकीत पक्ष संघटनेचा आढावा, नवीन बांधणी, सदस्य नोंदणी तसेच पक्षवाढी संदर्भात महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

बैठकीला महिला आघाडी जिल्हाप्रमुख डॉ. नयनाताई सिरसट,युवासेना जिल्हाप्रमुख सोमेश्वर गित्ते, जिल्हासचिव रोहित कसबे, उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, शिवाजी कुलकर्णी, दिपक मोराळे सह शिवसेनेचे जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील बैठकीचे आयोजन परळी तालुक्यात तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, शहरप्रमुख राजेश विभुते केज येथे तालुका प्रमुख अशोक जाधव, शहरप्रमुख तात्या रोडे, किशोर घुले, अंबाजोगाई येथे श्रीधर गरड, शहरप्रमुख अशोक हेडे यांनी केले होते.

## संपादकीय....

# जंगलाचा ऱ्हास की आणखी काही?

दोडामार्ग तालुक्यातील सातभाई जंगलात वाघिणीचा झालेला मृत्यू जंगलाचा ऱ्हास की आणखी कशामुळे झाला, असा प्रश्न गावकर्यांना पडला आहे. एका बाजूला विदर्भाचे वाघ पश्चिम घाटातील चांदोली अभयारण्यात सोडण्याची योजना वन खाते तयार करत आहे आणि दुसर्या बाजूला व्याघ्र संरक्षित प्रकल्प न राबवल्याने कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्री पट्ट्यातील वाघांचे मृत्यू समोर येऊ लागले आहेत. यातून कोकणी माणूस अस्वस्थ झालेला पाहायला मिळत आहे. वाघोबा म्हणजे देव अशी इथल्या भाबड्या माणसांची वर्षानुवर्षाची संकल्पना आहे. वाघ गेला तेही देवकोंडीमध्ये याचा अर्थ काय? याचा शोध आता हा भाबडा माणूस घेत आहे.

सह्याद्रीच्या पर्वतरांगा जैवविविधतेतील जागतिक मूल्यांकनात पहिल्या बारा हॉटस्पॉटपैकी एक अशी नोंद झालेला प्रदेश आहे. या भागात पट्टेरी वाघ आहेत, असे इथले नागरिक टाहो फोडून सांगत होते. पण, वन खात्याला पुरावे हवे होते. मध्यंतरी आंबोली, दोडामार्ग भागात पट्टेरी वाघांच्या पाऊलखुणा सापडल्या, तरी त्यातून बोध घेऊन व्याघ्र संवर्धनाची मोहीम हाती घेतली गेली नाही. वाघ म्हणजे जंगलचा राखणदार अशीच संकल्पना पूर्वापार मांडत आलेले आपले पूर्वज आणि त्याच भूमिकेला समरस होऊन काम करणारी इथली माणसं वाघाच्या मृत्यूने अस्वस्थ झाली आहेत. वाघ जंगलात असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण मानले जाते. खरं तर, अन्न साखळीतील वाघ हा महत्त्वाचा घटक आहे. आज कोकणात कधी नव्हे एवढा माकडांचा आणि गव्यांचा त्रास भातशेती आणि फळशेतीला होऊ लागला आहे. खरं तर, जंगलातील वाघ या उपद्रवी प्राण्यांची संख्या कमी करतो. परंतु, मध्यंतरी वाघच या जंगलातून नेस्तनाबूत झाल्याने शेतीवरील संकट वाढले. आता पुन्हा एकदा वाघ या जंगलामध्ये परतले असताना वाढते मायनिंग प्रकल्प, खडी क्रशरचे बेसुमार उद्योग आणि विकासाच्या प्रकल्पांच्या नावाने होत असलेला जंगलांचा ऱ्हास यामुळे जंगलचा राजा वाघ या जंगलात टिकेल की नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

दोडामार्गच्या सातभाई जंगलात असलेल्या सात कुंडांपैकी देवकुंडामध्ये भक्ष्याच्या मागून धावताना कुंडात पडून वाघिणीचा मृत्यू झाला. या जंगलात वन विभागाची फारशी गस्त नसल्याने या वाघिणीला वेळीच मदत मिळू शकली नाही. हा वाघीण म्हणजे जंगलातील महत्त्वाचा घटक असलेला प्राणी. मृत्यू झालेली वाघीण या देवकुंडातून बाहेर येण्यासाठी अनेक दिवस झगडली. तिच्या पायाची वर येण्यासाठी धडपडणारी नखे या भिंतीवर साक्ष देत आहेत. दुर्दैवाने तिला मदत मिळाली नाही आणि या उपाशी वाघिणीचा मृत्यू झाला. आता तरी बोध घेऊन वन विभाग वाघांच्या संरक्षणासाठी काही करणार आहे का, असा प्रश्न उभा राहिला आहे.

सह्याद्रीच्या समृद्ध जंगलाचे सामर्थ्य असलेला वाघ टिकविणे ही आज पर्यावरणाची गरज आहे. कर्नाटकातील दंडकारण्य कोकणच्या उशाशी असलेला सह्याद्री आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूर्वेचा प्रदेश मिळून हे समृद्ध जंगल तयार झाले आहे. इथे वाघ आणण्याची गरज नाही. असलेल्या वाघांच्या संरक्षणाची तजवीज करण्याची गरज आहे. हे दोडामार्गच्या वाघिणीच्या घटनेतून समोर आलेले वास्तव आहे. यानंतर तशी सह्याद्री वाचवण्याची आणि वाघांना वाचवण्याची मोहीम हाती घ्यावी लागेल. वनसंवर्धन आणि त्यातील वन्यप्राण्यांच्या संवर्धनाच्या गप्पा मारला जात असताना त्यावर कोणत्याही प्रकारची ठोस पावले उचलण्याचे प्रयत्न केल जात नाहीत. जगभरातील सुमारे १८ हजारांहून अधिक प्रजाती धोक्यात असल्याचे नुकतेच एका सर्वेक्षणातून समोर आले. या भयावह वास्तवाची नोंद माणसाने घेण्याची गरज आहे.

# सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन !.

आपल्या देशात आपल्या मातृभूमीत जन्मलेल्या लोकांचे फारसी दखल घेतली जात नाही.पण सातासमुद्रापार कोणी काही केले असेल तर त्याला जागतिक महत्व असते. त्यामुळेच देशात प्रत्येक वेळा जागतिक दिन मानले जातात व ते उस्त्पुर्तपणे साजरे केले जातात. भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यात महिलांचे प्रमाण पुरुषा बरोबर ८५/९० टक्क्या पर्यंत आहे.महिला वर्ग हा सर्वात अज्ञानी,असुशिक्षित,असंघटीत होता आणि आज ही आहे.मुठभर महिला सुशिक्षित उच्चशिक्षित सुद्धा आहेत. त्या दरवर्षी महिला दिन आठ मार्चला साजरा करतात.पण ९० टक्के महिलांना आठ मार्च महिला दिन का साजरा करतात.ते सांगता येत नाही.जगातील महिला एकत्र येऊन त्यांनी मोठा संघर्ष केला म्हणून आठ मार्च जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो असे म्हणतात. पण त्या कोण महिला होत्या त्यांनी कोणा बरोबर संघर्ष केला. जातीव्यवस्थे विरोधात त्या लढल्या काय?.शिक्षण घेण्या करिता लढल्या काय?. त्याकाळी त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता काय?. मग त्यांनी डायरेक मतदानाचा अधिकार कसा काय मागितला?. भारतात तो जगाचा जागतिक महिला दिन का पाळला जातो.भारतातील महिलाच्या आणि जगातील त्या महिलांचे समस्या समान होत्या काय?.या देशात सात च्या आत महिला घरात पाहिजे शिक्षणात,संपतीत, मालमतेत, आर्थिकदृष्ट्या तिला आजही किती अधिकार आहेत.हे त्या महिला दिना निमित्य कोणी किती ऐतिहासिक कार्य केले. भारतातील बहुसंख्य असंघटीत महिलांना आठ मार्च महिला दिन कशाचा समजले पाहिजे.पण तसे न होता दरवर्षी सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन साजरा होतो.

भारतात महिला दिनाची सुरुवात मुंबई येथे ८ मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा करून झाली. त्यानंतर ८ मार्च १९७१ ला पुण्यातील काही संघटनानी मोर्चा काढला.त्यानंतर १९७५ ला युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले.त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजा समोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. स्त्रिया बोलत्या व्हायला लागल्या. बदलत्या सामाजिक,आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती नुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका,रेल्वे सरकारी,निमसरकारी कार्यालये तसेच काही राजकीय पक्ष नेत्यांच्या घरात व कार्यालयात ८ मार्च महिला दिन साजरा व्हायला लागला.

भारतात ज्या महिलेने पहिले स्वता शिक्षण घेऊन मुलीना शिक्षण देण्यासाठी पाहिली शाळा काढली. ती १ मे १८४७ रोजी.सावित्रीबाई फुले (जन्म ३ जानेवारी १८३१,जन्म स्थळ-नायगाव,सातारा-मृत्यू- १० मार्च १८९७ पुणे येथे झाला.) त्या पहिल्या महिला शिक्षिका,शिक्षण प्रसारक,समाज सुधारक महिला होत्या.महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची सुरुवात महात्मा ज्योतीराव फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन केली. तो खरा महिला दिन किंवा महिला शिक्षण दिन असायला पाहिजे होता.पण.....हळदकुंकू, मंगल गौरी साजरा करणाऱ्याचा महिला दिन मोठ्या उत्स्पुर्तपणे साजरा होतांना दिसत आहे.म्हणूनच लिहतो सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन !.

संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळ जवळ जगभरच्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. हे सांगितल्या जाते पण त्यांना शिक्षणाचा अधिकार होता काय हे सांगितल्या जात नाही.पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण देण्यात येते. या अन्याया विरुद्ध स्त्रिया (कोणत्या) आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या. १८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्का संदर्भात द नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन स्थापन झाली.परंतु ही असोसिएशन सुद्धा वर्णद्वेषी आणि स्थालांतरीत पूर्वग्रह असणारी होती. दक्षिणे कडील देशांना काळया मतदात्यां पासून आणि उत्तर व पूर्वेकडील देशांना तेथील बहुसंख्य देशांतरीत मतदात्यां पासून वाचवण्याकरता स्त्रियांना मतदानाच्या हक्क मिळायलाच हवा, अशा प्रकारचे आवाहन ती करत होती. अर्थात या मर्यादित हक्कांना बहुसंख्य काळया वर्णाच्या आणि देशांतरित कामगार स्त्रियांनी जोरदार विरोध केला आणि क्रांतिकारी मार्क्सवाद्यांनी केलेल्या सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या हक्कांच्या मागणीला पाठिंबा दिला. १९०७ साली स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली.त्यामध्ये क्लारा झेटकिन या अतिशय लढाऊ बाण्याच्या, झुंजार कम्युनिस्ट कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्या साठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे.अशी घोषणा केली.

८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यां बरोबरच लिंग,वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी निरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली.१९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा जागतिक महिला-दिन म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो प्रसार झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून १९१८ साली इंग्लंडमध्ये व १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले. तो महिला दिन डावे समाजवादी पुरोगामी भारतात साजरा करतात.त्यांना भारतातील १८३१ ला जन्मलेली आणि १८४७ ला मुली करिता म्हणजे महिला करिता पहिली शाळा काढलेली सावित्रीबाई फुलेचे कार्य आणि कर्तुत्व दिसत नाही. ज्या महिला आणि शिक्षणसंस्था सरस्वती शिक्षणाची देवी मानतात त्याच महिला आठ मार्च महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतात.हाच सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन असतो.




त्याच बरोबर ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यां बरोबरच लिंग,वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी निरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागनीने अमेरिका न्यूयार्क हालविला सांगितल्या जाते. तेच काम भारतातील मुंबईच्या असंघटीत गिरणी कामगाराना संघटीत करण्याचे काम महात्मा ज्योतीराव फुले यांचे शिष्य रावबहादूर नारायण मेघांजी लोखंडे यांनी १८६० ते १८९० पर्यंत केल. त्याची नोंद मात्र डावे समाजवादी पुरोगामी घेत नाही.रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी सप्टेंबर १८८४ मध्ये मुंबई येथे पहिली मोठी कामगार परिषद भरवून कारखाना आयोगाकडे ५,५०० कामगारांचे लेखी निवेदन पाठविले. त्यात दर रविवारी पगारी सुटी, दररोज नियमित कामाच्या १४ तासांऐवजी आठ तास,मुलांचे नोकरीचे वय ७ वर्षांवरून ९ वर्षे करावे, दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत वेतन मिळावे,कामगाराला दुखापत झाल्यास पगारी रजा मिळावी, तसेच फार मोठी शारीरिक इजा होऊन कामगार कामासाठी अपात्र ठरल्यास त्याच्या भावी जीवनासाठी आर्थिक तरतूद केली जावी.इत्यादी. मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. या मागण्यांचे निवेदन कलकत्त्यास गव्हर्नर जनरलकडेही पाठविण्यात आले होते (१८८९). रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी १८९० मध्ये मुंबई गिरणी कामगार संघ (बॉम्बे मिलहँड्स असोसिएशन) नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापना केली होती. एप्रिल १८९० मध्ये दहा हजार स्त्री-पुरुष कामगारांची मोठी परिषद रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी मुंबईत भरविली होती. या परिषदेत स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मुंबईतील औद्योगिक संघटनांच्या चळवळीतील ही महत्त्वाची घटना समजली जाते. त्यानंतर लगेचच १० जून,१८९० रोजी शासनाने, कामगारांना दर रविवारी पगारी सुटी देण्याचा निर्णय जाहीर केला. १८९० मध्ये कामगार कायदा संमत करण्यात येऊन लोखंडे यांच्या काही सूचनांचा त्यात समावेश करण्यात आला. सरकारने त्यांच्या कामगिरीची दखल देऊन त्यांना 'जे.पी.' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.हा इतिहास महिला दिन साजरा करणारे का विसरतात?. फुले लोखंडे याचे कार्या पेक्षा जात महत्वाची वाटते म्हणून का???.

भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या महिला नेत्यांना आणि त्याच्या आदर्श नेत्यांना भारतातील सावित्रीबाई ज्योतीराव फुले डोळ्या समोर ठेऊन महिला दिन साजरा करावा असे का वाटत नाही.कारण काल त्या होत्या म्हणून तुम्ही आज सन्मानाने या ठिकाणी आहेत भारतातील सावित्रीमाई फुले कुठे कमी पडतात. ते भारतातील महिला दिनाचे गोडवे गाणाऱ्या महिला पत्रकार,थोर विचारवंत,महिला साहित्यिक,लढाऊ महिला नेत्या आणि सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या महिलांनी जाहीर पणे सांगावे. महिला दिन जरूर साजरा करा पण त्या भारतातील राष्ट्रमाता जिजाऊ,अहिल्याबाई होळकर,ताराराणी,सावित्रीबाई फुले,भिमाबाई,माता रमाई,इंदिरा,प्रतिभाताई,मायावती,जयललिता ,ममता,ज्यांनी जीवनात खऱ्या अर्थाने संघर्ष करून इतिहास घडविला त्यांच्या आई बापाचे नांव गांव,तालुका,जिल्हा,राज्य माहित होते आणि आहे. त्या महिलांचा आदर्श आजच्या सुशिक्षित महिलांनी घेऊन महिला दिन साजरा करावा हीच अपेक्षा.आज राज्यात देशात महिलेवर तरुणीवर लैंगिक अत्याचार केला जातो. त्यावेळी त्या तरुणीची महिलेची जात आणि अत्याचार करणाऱ्यांची जात माहिती पडल्या नंतर आंदोलन करणाऱ्या संस्था,संघटना,कार्यकर्ते,नेते,समाज सेवक,पत्रकार,संपादक कशी भूमिका घेऊन काम करतात हा एक सत्य संशोधन करण्याचा विषय झाला आहे. म्हणूनच शेवटी मान्य नसलेल्या व मनुवादी विचारांच्या राजकीय लोकांनी लादलेल्या महिला दिन. सुशिक्षित महिलांच्या अज्ञानी महिला दिनाला सुद्धा हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद!.

*******

सागर रामभाऊ तायडे.
९९२०४०३८५९
,भांडुप,मुंबई
अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना,स्वतंत्र मजदूर युनियन,महाराष्ट्र राज्य

# महिला दिन आणि सुरक्षाचं इक्वेशन जुळतं का?

आंतरराष्ट्रीय महिला दिन हा दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा केला जातो. महिला हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो. हा दिवस लिंग समानता, पुनरुत्पादक हक्क, महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो. सार्वत्रिक महिला मताधिकार चळवळीमुळे उत्तेजित असणारा हा दिवस २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात उत्तर अमेरिका आणि युरोपमधील कामगार चळवळींमधून सुरू झाला. हा दिवस महिलांसाठी खूप खास मानला जातो. त्यांच्या समान हक्कांना आणि समानतेला प्रोत्साहन देतो. जगभरातील महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकियदृष्ट्या सक्षम बनवण्यावर भर दिला जातो.

१९७५ ला संयुक्त राष्ट्रांनी पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला. २ वर्षानंतर १९७७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने सर्व सदस्य देशांना बोलावून ८ मार्च हा दिवस महिला हक्क दिन म्हणून घोषित केला. परंतु त्याचा इतिहास बराच जुना आहे. २८ फेब्रुवारी १९०९ रोजी अमेरिकन सोशलिस्ट पार्टीने पहिल्यांदा महिला दिन साजरा केला. १९०९ नंतर फेब्रुवारीच्या शेवटच्या रविवारी महिला दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. १९१० मध्ये सोशलिस्ट इंटरनॅशनलच्या कोपनहेगन परिषदेत त्याला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्यात आला. त्यावेळी त्याचा उद्देश महिलांना मतदानाचा अधिकार देणे हा होता. १९१७ मध्ये रशियामध्ये महिलांनी ऐतिहासिक संप केला. ज्यामुळे झारने सत्ता सोडली आणि महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.

त्यावेळी रशियामध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरात होते. तर जगातील इतर देशांमध्ये ग्रेगोरियन कॅलेंडर पाळले जाते. या दोन्ही कॅलेंडरच्या तारखामध्ये खूप फरक होता. ज्युलियन कॅलेंडरनुसार फेब्रुवारी १९१७ चा शेवटचा रविवार २३ फेब्रुवारी होता आणि ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये ही तारीख ८ मार्च होती. अशाप्रकारे ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. महिला दिनाच्या माध्यमातून लोकांना महिलांच्या संघर्षाची जाणीव करून दिली जाते. हा दिवस महिलांवरील गैरवर्तन, समाजातील त्यांची भूमिका आणि त्यांच्या हक्कांबद्दल जागरुकता निर्माण करतो. कारण आजही अनेक महिला स्वत: निर्णय घेऊ शकत नाही.

८ मार्चचा हा खास दिवस महिलांना समान हक्क आणि सन्मान मिळण्यासाठी तसेच त्यांच्यात जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. संपूर्ण जगभरात महिलांनी विविध क्षेत्रात उत्तुंग झेप घेतली आहे. काबाडकष्ट करून आणि कुटुंबाची जबाबदारी पार पाडत महिलांनी अनेक क्षेत्रात यशाचं उंच शिखर गाठलं आहे. महिलांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केलं जातं. राजकारणापासून विज्ञान, कला, संस्कृती आणि इतर क्षेत्रात योगदान देणा-या महिलांना सन्मानित केलं जातं.

जागतिक महिला दिन साजरा करण्यासाठी ८ मार्च हा दिवस निवडण्यामागे एक खास कारण आहे. अमेरिकेत काम करणा-या महिलांनी त्यांच्या अधिकारांसाठी ८ मार्चला आंदोलन केलं होतं. न्यूयॉर्कमध्ये १९०८ ला कामगारांना सन्मानित करण्याच्या उद्देशाने सोशलिस्ट पार्टी ऑफ अमेरिकाने हा दिवस निवडला होता. तर रशियाच्या महिलांनी महिला दिवस साजरा करताना पहिल्या महायुद्धाला विरोध केला होता. रशियाच्या महिलांनी 'ब्रेड एंड पीस' साठी १९१७ ला आंदोलन केलं होतं. युरोपमध्येही शांततापूर्ण वातावरणाची निर्मिती करण्यासाठी महिलांनी रॅली काढली होती. या कारणांमुळे ८ मार्च आंतराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली.

आपण महिला दिन साजरा करतो हे खरं, पण आजची महिला ही कितपत सुरक्षित आहे यावर प्रकाश टाकणे जिकरीचे झाले आहे. विद्येचे माहेरघर आणि सांस्कृतिक केंद्र असलेल्या पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातील बलात्कारामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा प्रकाशझोतात आला आहे. यामुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. दर तासाला लहानमोठे छेडखानीचे नि दर दिवसाला घडणारे बलात्कारासारखे गंभीर गुन्हे आणि नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार ही महिला अत्याचाराची शृंखला अवर्णनीय आहे. यामधून ४ वर्षाची कन्यासुद्धा सुटलेली नाही. अशा घृणास्पद घटना दृष्टिक्षेपास पडल्या की मन हेलावून जातं आणि हाच का तो संस्कृतीप्रधान देश नि हाच का तो सुसंस्कृत राज्य? यासारख्या कित्येक प्रश्नांनी मनात काहूर पेटतं.

स्त्री ही अबला नसून सबला आहे. हे वाक्य केवळ बोलण्यासाठी, लिहिण्यासाठी आणि घोषणा देण्यासाठी कितीही चांगले वाटत असले, तरी प्रत्यक्षात वावरताना मात्र स्त्रीला अत्यंत कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागते. समाजातील समाजकंटकाच्या वाईट नजरा, रस्त्यावरील चाळे आणि प्रवासातील किळसवाणा स्पर्श...या व अशा कित्येक गोष्टींपासून स्वत:चा बचाव करीत आपले जीवन व्यतीत करावे लागते. प्रत्येक ठिकाणी म्हणजेच कोणत्याही क्षेत्रात कार्य करताना काही स्त्रियांना कमी अधिक प्रमाणात अशा समस्यांना फेस करावं लागते. आज आपण कितीही पुढारलेपणाच्या गप्पा मारीत असलो तरी आज एकट्या स्त्रीचा प्रवास खडतर झाला हे कटू सत्य नाकारता येत नाही.

स्त्री संरक्षण ही केवळ पोलिसांचीच जबाबदारी नसून पूर्ण समाजाची आहे. याची जाणीव प्रत्यकाला असणे आणि एखाद्यावर हल्ला होत असताना केवळ बघ्याची भूमीका घेवून व्हिडिओ बनवण्यात मग्न न होता मदतीला धावून जाण्याची शिकवण समाजात रुजविणे गरजेचं आहे. समाजात स्त्री सन्मान, आदराची भावना प्रत्यक्ष आचरणात आणणे आवश्यक आहे. शिवाय 'निर्भया ॲप', 'एसओएस ॲप', 'विथ यू ॲप' आणि 'वुमन सेफ्टी ॲप' विषयी संपूर्ण माहितीसह महिलांना जागृत करणे अत्यावश्यक आहे. महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर आणि सामाजिक उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे स्त्रियांनीही काही बाबतीत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. शक्यतो रात्री एकटीने प्रवास करू नये. रात्री प्रवास करण्याची गरजच भासल्यास पोलीस विभागाकडून पुरविण्यात येणा-या सेवेचा लाभ घ्यावा. खाजगी वाहनाने प्रवास केल्यास वाहनाची सर्व माहिती आणि लोकेशन वेळोवेळी घरच्यांशी शेअर करावी. नेहमी बाहेर पडताना स्वसंरक्षणार्थ सेफ्टी टार्च, पेपर स्प्रे, पेपर जेल, स्विस चाकू, व्हिसल, चिली पाउडर यासारख्या वस्तू जवळ बाळगावे. अनोळखी व्यक्तीसोबत स्वत:ची कोणतीही माहिती शेअर करू नये. अनोळखी व्यक्तीला मदत मागू नये वा स्वीकारूही नये. सोशल मीडियावरील फ्रेन्डशिपची कोणतीही रिक्वेस्ट ताबडतोब न स्वीकारता पुष्टी करूनच स्वीकारावी. आलेली प्रत्येक रिक्वेस्ट स्वीकारलीच पाहिजे असं नाही. दुर्दैवाने अतिप्रसंगाला फेस करण्याचा प्रसंग ओढावलाच तर घाबरून न जाता अत्याचारी नराधमाच्या नाजूक भागावर प्रहार करून संरक्षणाचा प्रयत्न करावा.

बलात्काराच्या घटनेने कायदा व सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहे. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाकच उरलेला नाही. विशेष म्हणजे बहुतांश गुन्हेगारांचे राजकिय नेत्यांशी संबंध असल्याचे स्पष्ट होत असल्याने त्यांचे धाडस वाढत आहे. राज्यात महिलांची असुरक्षितता दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात घडलेल्या काही घटनांमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. या घटनांना लगाम लावायचा असेल तर सरकारला कठोर पावले उचलावी लागेल आणि असा कायदा अमलात आणावा लागेल की, पिडीतांना तात्काळ न्याय मिळेल. महाकुंभाच्या आयोजनासाठी राज्य सरकारने ५४२५ कोटी ५८ लक्ष रुपयाचे बजेट राखीव ठेवले होते आणि या कार्यक्रमासाठी सुमारे ७५०० कोटी खर्च अपेक्षित होते. तसेच केंद्र सरकारने २१०० कोटींची तरतुद केली होती. समजा, हीच रक्कम महिला सुरक्षा, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि विकास यासाठी जर केली असती तर किती चांगले झाले असते? सरकारने ते करणेही गरजेचं होतं आणि पुढेही राहील.

**********

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

# महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षित

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा व पद आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे. देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे.आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या दीसुन येतात.अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केले नाही.ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे. त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा महीलांपासुनचसर्वांना मिळत असते. कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना संस्कृतीचापाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर,नर्स,पायलट, वकील,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे.म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर,अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या, आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही. महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ.कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने फास्ट ट्रॅककोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे. कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण, अत्याचार किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे.आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत तेव्हाच खऱ्याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो. ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे. तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात.कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे. आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये तारीख पे तारीखअसा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा संकल्पकेला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल.म्हणुनच म्हणतात बेटी बचाव बेटी पढाव. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली देण्याचे,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे.आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे. यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते. असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.जय हिंद!

**********

लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार.
(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.

# आनंदी जीवनासाठी महिलांनी गरोदरपणात घ्यावी मौखिक आरोग्याची विशेष काळजी जागतिक महिला दिन विशेष

महिला दिन हा केवळ आनंदोत्सव साजरा करण्याचाच नाही तर महिलांच्या मौखिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याचा एक दिवस आहे. सध्याचे धावपळीचे जीवन आणि वाढत्या जबाबदाऱ्यांमध्ये महिला अनेकदा स्वतःकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे त्या शारीरिक आणि मौखिक आरोग्य यासारख्या समस्यांना बळी पडू शकतात. खास करून गर्भधारणेच्या काळात मौखिक व दंत आरोग्याला प्राधान्य देऊन आनंदी आणि संतुलित जीवन जगू शकतात. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे मौखिक व दंत आरोग्य याविषयाचा वेध घेणारा डॉ. प्राजक्ता गायकवाड यांचा हा विशेष लेख..!



गरोदरपणात मौखिक आरोग्य हे सहसा डॉक्टर, दंत वैद्य आणि स्वत: गरोदर मातेमुळे दुर्लक्षीत होते. त्यामुळे भावी आयुष्यात माता व बालक या दोघांना मुख - दंत समस्या निर्माण होऊ शकतात. गरोदरपणात इतर संपूर्ण शरीराप्रमाणे मौखिक आरोग्याची काळजी घेणे ही तितकेच महत्त्वाचे असते. मातांमधील कॅरिओजेनिक जिवाणू संसर्गामुळे येणाऱ्या नवजात बालकास दंत क्षय होऊ शकतो. त्यासाठी प्रत्येक गर्भवती महिलेने इतर तपासण्याप्रमाणे मौखिक आरोग्य तपासणीही करणे गरजेचे आहे. गर्भधारणे दरम्यान योग्य दंत उपचार आणि योग्य ती खबरदारी घेतल्याने दंत क्षयाचा धोका कमी होतो.

गरोदरपणात उद्भवणाऱ्या मुख - दंत समस्या

१. दातांची झीज (एपराशश्र ऐीळेप) - गर्भधारणे दरम्यान बऱ्याचदा गॅस्ट्रीक आम्लाचे प्रमाण वाढते. त्यामुळे दातांवरील पहिला थर नष्ठ होण्यास सुरुवात होते. गर्भधारणेच्या प्रारंभीच्या काळात मॉर्निंग सिक्नेस होणे सामान्य आहे. शरीरातील हार्मोनल बदलामुळे आम्ल ओहोटी वाढून मळमळणे, उलटी होणे अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे सुरुवातीच्या दिवसात आहार आणि जीवन शैलीत बदल करणे गरजेचे आहे. आवश्यकते नुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने अँटीइमेटिक्स व अँण्टासिड् ही औषधे घेऊ शकता. आहारात अम्लीपदार्थाचे सेवन कमीत कमी करणे गरजेचे आहे. एक कप पाण्यात एक चमचा बेकिंग सोडा टाकून गुळण्या केल्याने अम्ल निष्प्रभ होऊन मळमळ, उलट्या होण्याचे प्रमाण कमी होऊ शकते, सौफ्ट ब्रिसल्स असलेली टूथब्रश वापरल्यामुळे इनॅमल इरोजन रोखता येईल. ण्टीसेन्सिटीव माऊथवॉशचा वापर करावा. त्यामुळे सळसळणाऱ्या दातांचे संरक्षण होईल व दातांवरील जिवाणूंचे प्रमाण कमी होईल.

२. दंतक्षय (उशपींरश्र उरीळशी) - गरोदरपणात एक चतुर्थांश स्त्रियांना दंत क्षय होतो. हा एक मौखिक रोग आहे. ज्या मातांमध्ये दंत क्षयाचे प्रमाण अधिक आहे. त्यांच्या मुलांना येत्या काळात दंतक्षय होण्याचा धोका अधिक असतो. आहारातील कार्बोहायड्रेट तोंडी जिवाणूंच्या माध्यमातून अम्लामध्ये अंबवले जातात. जे इनॅमलचे डीमीनरलायझेशन करते व दंतक्षय होण्यास सुरुवात होते. तसेच त्याशिवाय इतर अनेक कारणांमुळे गर्भवती महिलांना दंतक्षय होण्याचा धोका वाढतो. त्यामध्ये साखर युक्त आहाराची लालसा, तोंडी पोकळी मध्ये वाढलेली अम्लता, सतत थोड्या थोड्या वेळाने वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केल्याने दंतक्षय होण्यास सुरुवात होते.

सुरुवातीच्या काळात दंतक्षय होण्यापुर्वी दातांवर पांढरे डाग पडतात. त्यानंतर त्याच भागामधील दातांचे डीमीनरलायझेशन होऊन ते तपकीरी रंगाचे दिसतात. त्यावर वेळीच उपचार न केल्यास त्याठिकाणी दंतक्षय होतो. पुढे त्याचे रुपांतर ब्सेस व सेल्युलायटिस मध्ये होते.

गर्भवती महिलांनी फ्लोराईडयुक्त पेस्टने दररोज सकाळी व रात्री नियमितपणे ब्रश करावा, साखरयुक्त पदार्थ (उदा. चॉक्लेट, बिस्किट, पेस्ट्रीज) मर्यादित प्रमाणात खावेत, दिवसातून दोन वेळा माऊथवॉशचा वापर करुन गुळण्या कराव्यात, अम्लयुक्त पदार्थांचे सेवन कमी करावे, दातां मध्ये दंतक्षय झाला असेल तर वेळीच दंतरोग तज्ञांकडून उपचार घ्यावेत.

३. हिरड्यांना सुज येणे (ऋळपसर्ळींळींळ) - गर्भवती महिलांमध्ये हिरड्यांना सुज (ऋळपसर्ळींळींळ) येणे सर्वसामान्य आहे. गर्भधारणे मध्ये याचे प्रमाण हे ६० ते ७५ टक्यापर्यंत वाढते. हिरड्यांना सुज येणे, हिरड्या लाल होऊन रक्त येणे, ब्रश करताना हिरड्यांतून रक्तस्त्राव होणे, श्वासातून दुर्गंधी येणे, जळजळ होणे ही लक्षणे दिसून येतात. इस्ट्रोजेन व प्रोजेस्टेरॉन या हार्मोन्सच्या चढ उतारामुळे गर्भधारणे दरम्यान हिरड्यांना सुज येण्याबरोबर वरील प्रमाणे लक्षणे दिसून येतात. त्यामुळे गर्भवती महिलांनी या काळात तोंडाच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते. त्यामध्ये दररोज दोन वेळा ब्रश करणे, डेन्टल फ्लॉसचा वापर करणे, माऊथ वॉशचा किमान दोन वेळा वापर करावा, मल्टी विट्यामिन्स गोळ्यांचा समावेश करावा व दंत रोग तज्ञांकडून तपासणी करून दातांची स्वच्छता करुन घ्यावी.

४. हिरड्यांचा आजार (झशीळेवेपींळींळी) मौखिक आरोग्याकडे दिर्घकाळ दुर्लक्ष केल्याने दातांच्या सभोवतील हिरड्यांना संसर्ग होऊन पायरिया म्हणजेच हिरड्यांचा आजार होतो. दातांवर प्लाक जमा झाल्याने हा आजार उद्भवतो. त्यावर वेळीच उपचार न केल्यास हिरड्यांतून रक्त येवून दातही गमवावे लागू शकतात. गरोदरपणात या आजाराचे प्रणाण २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढते.

तोंडाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने हिरड्यांचा आजार होतो. त्यामुळे जिवाणू दाताच्या काटावर (एवसशी) प्लाक तयार करतात. योग्य वेळी निदान झाले नाही तर प्लाक कॅल्सिफाईड होऊन त्याचे रूपांतर टारटर मध्ये होते. केवळ मौखिक अस्वच्छतेमुळे नव्हे तर हार्मोन्सच्या असंतुलन व ताण-तणाव यामुळे देखिल हा आजार होऊ शकतो. स्त्रियांमध्ये मासिक पाळी व गरोदरपणात हार्मोन्सचे असंतुलन दिसून येते. त्याचबरोबर गरोदरपणात सायटोकाईन्स, प्रोस्टॅग्लॅन्डिन्स, इंटरल्युकिन्स या इंफ्लामेट्री मेडिएटर्स यांच्या प्रमाणात वाढ होऊन हिरड्यांवर सुज येते.

दातांवर पिवळसर होणे, प्लाकचा संचय होऊन दातांवर कठीन टारटर जमा होणे, मुख दुर्गंधी येणे, हिरड्यांमधुन रक्तस्त्राव व वेदना होणे, हिरड्यांची हळु हळु झिज होणे, दात सैल होणे, अशी लक्षणे दिसून येतात. हिरड्यांच्या आजाराच्या प्रथमावस्थेत व्हिज्युअल तपासणीव्दारे हिरड्यांची स्थिती माहिती करुन घेतली जाते. हिरड्यांच्या आजाराची स्थिती दांतामध्ये जमा झालेल्या प्लाक वरुन समजते. त्यानंतर त्याचे रुपांतर कॅल्क्युलस मध्ये होते. मात्र नुसते ब्रश करण्याने ते निघुन जात नाही तर दंत वैद्याकडून तपासणी करुन घेणे आवश्यक असते. हाडांची झिज व प्लाकची स्थिती समजून घेण्यासाठी एक्सरे करणे गरजेचे असते. जमा झालेला प्लाक व कॅलक्युलस दंत वैद्य दातांची सफाई करुन काढून टाकतात. प्लाक जमा होण्यापासून संरक्षण होण्यासाठी दातांची नियमित स्वच्छता करणे व फ्लॉसिंग करणे आवश्यक आहे. दातांच्या स्वच्छतेनंतर (ड्लरश्रळपस ठीं झश्रपपळपस) दर तीन महिन्यांनी दंत वैद्याकडे तपासणी करुन घ्यावी.

*********

डॉ. प्राजक्ता गायकवाड
बाल दंतरोग तज्ञ,
बाल दंतरोग विभाग,
एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय, लातूर.

## विश्वातील सर्वोच्च उंचीवर वसले आहे महादेवाचे हे मंदिर, इथेच माता पार्वतीने केली होती तपश्चर्या

हिंदू धर्मात भगवान शंकर आणि माता पार्वतीच्या उपासनेला एक विशेष महत्त्व देण्यात आले आहे. भगवान शिवाला सोमवार हा दिवस फार प्रिय आहे, या दिवशी भक्तजन त्यांची पूजा-अर्चा करत त्यांना फळे आणि फुले अर्पण करतात. तसेच अनेकजण या दिवशी महादेवाच्या मंदिरांनाही भेट देतात. तुम्हीही शिवमंदिराला भेट देण्याचा विचार करत असाल, तर उत्तराखंडमध्ये असलेल्या तुंगनाथ मंदिराला अवश्य भेट द्या. हे मंदिर उत्तराखंडच्या रुद्रप्रयाग जिल्ह्यात आहे. तुंगानाथ मंदिर पंच केदारमध्ये समाविष्ट आहे. अशा परिस्थितीत या मंदिराशी संबंधित काही रंजक गोष्टी जाणून घेऊया.

तुंगनाथ मंदिराचा इतिहास तुंगनाथ मंदिर हे शिवाच्या सर्वोच्च मंदिरांपैकी एक आहे. धार्मिक मान्यतेनुसार, पांडवांनी तुंगनाथ मंदिर भगवान शिवाला प्रसन्न करण्यासाठी बांधले होते. हे मंदिर भारतीय स्थापत्य शैलीत बांधलेले आहे. याच ठिकाणी माता पार्वतीने महादेवाला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी तपश्चर्या केली असल्याचे सांगितले जाते. मंदिराबाबत आणखीन एक मान्यता आहे की, रावणाचा वध केल्यानंतर याच ठिकाणी प्रभू रामानेतपश्चर्या केली होती. रावण ब्राह्मण असल्यामुळे रामजींवर ब्रह्महत्याचा आरोप होता, ज्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी रामजींनी तुंगनाथ मंदिरात तपश्चर्या केली. या मंदिरापासून काही अंतरावर चंद्रशिला मंदिर आहे. या मंदिरात गेल्याशिवाय तुंगानाथ मंदिरात उपस्थित महादेवाचे दर्शन अपूर्ण मानले जाते. हे मंदिर समुद्रसपाटीपासून सुमारे ३६८० मीटर उंचीवर आहे. या मंदिराचे सौंदर्य फार सुंदर असून ते पाहताच मन प्रसन्न होते. तुमच्या माहितीसाठी आम्ही तुम्हाला सांगतो की, जास्त बर्फवृष्टीमुळे तुंगनाथ मंदिर नोव्हेंबर ते मार्च दरम्यान बंद असते. महादेवाच्या प्रमुख मंदिरांमध्ये या मंदिराचा आवर्जून समावेश होतो. तुंगनाथ मंदिराला कशी भेट द्याल? दरवर्षी या मंदिरात हजारोंच्या संख्येने पर्यटक भेट देण्यासाठी येत असतात. तुंगनाथ मंदिरात जायचे असेल तर विमान, रेल्वे किंवा रस्त्याने सहज या मंदिरापर्यंत पोहोचता येते. विमानाने जाण्यासाठी, तुंगानाथ मंदिराजवळ डेहराडूनचे जॉली ग्रांट विमानतळ आहे. येथून तुम्ही कॅबने चोपटाजवळील पांगर गावात जाऊ शकता. तुम्ही ट्रेननेही मंदिरात पोहोचू शकता. या मंदिराजवळ डेहराडून, हरिद्वार किंवा ऋषिकेश स्थानके आहेत. जिथून तुम्ही बस किंवा टॅक्सीच्या मदतीने चोपट्याला पोहोचू शकता. याशिवाय तुम्ही बसचीही मदत घेऊ शकता. यासाठी बसने पांगर गावात जाता येईल. येथून चोपटा येथे तुम्ही टॅक्सीने जाऊ शकता.

# स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल !

मनुस्मृतीत स्त्रीयांचा वेदाभ्यास व विद्या संपादन करण्याचा अधिकार नाकारण्यात आला. त्यात ब्राम्हण स्त्रीयांचा देखील समावेश होता. एवढेच नव्हे तर एखादा विद्यार्थी वेद वाचत असतांना स्त्री जर समोर आली असेल तर त्याने वेद वाचने थांबवावे, असेही मनुस्मृतीमध्ये लिहिल्या गेले आहे. म्हणजे स्त्रीयांच्या बाबतीत मनु किती खालच्या पातळीवर गेला होता, हे सिध्द होते. पाच हजार वर्षापूर्वीचे हे स्त्री-स्वातंत्र्य गेल्या ५०० वर्षापासून समाजाने स्वार्थापोटी बेडीत अडविले होते. भारतामध्ये जेवढी स्त्रीयांची मनुस्मृतीने अवनती झाली, तेवढी कोणत्याही देशात झाली नाही. स्त्रीयांना या देशात अत्यंत हीन व पुरुषापेक्षाही दुय्यम स्थान देण्यात आले. हे मनुवाद्यांना माहित असतांना कधीही त्यांनी मनुचा विरोध केला नाही किंवा मनुस्मृती जाळली नाही, कारण त्यात त्यांचा स्वार्थ दडलेला होता. स्त्रीयांच्या अवनतीला ब्राम्हणवादी व्यवस्था कारणीभूत आहे, हे सिध्द होते. आज २१ व्या शतकात स्त्रीचं क्षितीज खुप विस्तारीत झालं आहे. निसर्गातच स्त्री एक नाजुक तशीच धाकड, कणखर आणि त्यागाची मुर्ती समजली जाते. त्याचबरोबर तिच्यात सोशिकता व प्रचंड सहन शक्ति आहे, म्हणुनच कुठल्याही क्षेत्रात आज बेडरपणे महिला आघाडीवर आहेत. आपण कुणाचे गुलाम नाही, अन्याय-अत्याचार झाला, तर तो सहन करणार नाही, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने चालण्याचे समाधान आणि आत्मविश्वास त्यामुळे बळावतो. स्त्रीशक्ति इतकी बलाढय आहे की कोणत्याही परिस्थितीत ती स्वत:ला कमकुवत ठरु देत नाही, म्हणून तर त्यांनी निर्भय राहण्याचा चंग बांधला आहे.

अनेक वर्ष स्त्रीयांच्या भावना दाबल्या गेल्या म्हणून त्या आता उफाळून आल्या असं म्हणावं तर त्याचा अतिरेक झाला असं म्हणावं लागेल. स्त्रीमुक्ती हा विचार चळवळीचं रुप घेऊन आपल्याकडे आला आहे. वास्तविक स्त्रीमुक्ती हा शब्दच समाजानं उपहासात्मक करुन टाकला. स्त्रीमुक्ती या शब्दाची आणि त्यासाठी काम करणाऱ्या स्त्रियांना समान संधी मिळेल तेव्हा खिल्ली उडवत राहिला. तिला माणूस म्हणून जगायला मिळावं त्यासाठी स्वत: कुठल्याही तऱ्हेने पुरक न होता स्वातंत्र्यासाठी चाललेली तिची धडपड हास्यास्पद कशी ठरेल, याची वर उभे राहून वाट पाहत राहिला. तिच्याशी स्वत:चा काहीच संबंध नसल्यासारखा! तरीही उपहासाला थोडीही भीक न घालता स्त्री आज पाय रोवून उभी आहे. स्त्री-पुरुषातील विषमता, स्त्रीला पुरुषाने दिलेली गुलामीची वागणूक, तिच्यावर सदैव केलेली अरेरावी आजही वाढताहेत. शरीररचने पलिकडे अन्य कोणताही भेद स्त्री-पुरुषात असू शकत नाही म्हणून त्यांच्यासाठी सर्व कायदे, सर्व नियम सारखे असलेच पाहिजेत-भेदाभेद नको, तो अधिकार महिलांना मिळावा कारण व्यक्ती स्वातंत्र्यावरती हल्ला करणे लोकशाहीला अभिप्रेत नाही, तरी देखील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्याचे, आपला विचार निर्भिडपणे, अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने प्रत्येकाला दिलेत. समाजाच्या विचारात व मानसिकतेत बदल होणे आवश्यक असून तो बदलल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता साधल्या जावू शकत नाही.

थोडक्यात स्त्री-मुक्ति म्हणजे स्वातंत्र्याचा दुरुपयोग कुटुंब संस्थेला तडा नव्हे, स्त्री व पुरुष ही संसाररुपी स्थायी दोन समान चाके आहेत. ज्या रस्त्यावर हा रथ चालवायचा, तो रस्ता काही नियतीने अगदी गुळगुळीत करुन ठेवलेला नसतो. रस्त्यावर खाच-खडगे असणारच, संसाराचे देखील तसेच आहे. परस्पराच्या सामंजस्यातून हा संसाराचा रथ चालवावा लागतो त्याकरीता दोघांनीही त्याग करायला हवा. केवळ स्त्रीलाच त्यागाची, सहनशिलतेची मूर्ती बनवू नये. स्त्री-मुक्ति म्हणजे स्वत:चे व्यक्तिमत्व विकसीत करण्याचा हक्क प्राप्त करणे होय. १९९४ हे वर्ष खास महिलांसाठी धोरण आखणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आणि कालांतराने अशा महिला धोरणाचा राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. तरी देखील गेल्या २५ वर्षाहूनही अधिक काळ राज्यात या महिला धोरणांची यशस्वीरित्या अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही, ही शोकांतिका आहे. परंतू ती प्रत्यक्षात होत आहे किंवा नाही हे पाहणे महत्वाचे ठरते, त्यासाठी शासनाने एक समिती नेमावी. जी आपला अहवाल शासनाला अंमलबजावणीच्या संदर्भात सादर करीत राहील, हा पायंडा पाडण्याची गरज आहे.

आज जन्माला आल्यावर पहिला संबंध आईशी म्हणजेच एका स्त्रीशी येतो. मानवी जीवनाचा उगम तिच्या पासुन होतो आणि म्हणून ती आपल्या सगळयांची निर्माती आहे. जगाचा स्त्रीकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोण असतांना देखील परिस्थिती बदलनं खुप कठीण होऊन बसतं. शिक्षणाच्या माध्यमातून लोकांची मानसिकताही बदलण्याची मोठया प्रमाणात गरज आहे. स्त्रीयां आणि मुलींसाठी कायदे आहेत, योजना आहेत, समान शिक्षणाच्या संधी देखील आहेत, पण समाजाने हे फायदे महिलांपर्यंत पोहचू न देण्याची मानसिकता कमी-अधिक प्रमाणात जाणवते. त्याची सुरुवात आई-वडीलांकडुन व्हायला हवी तरच मुलींना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि तेव्हाच कुठे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास बळावेल. तसा प्रयास 'दंगल' या चित्रपटात कुस्तीगीर म्हणुन फोगाट या व्यक्तिरेखेत स्त्रीला आणून एक नविन पायंडा निर्माण करण्यात आला, ही खरंच देशाभिमानी बाब आहे.

विचारांची व परंपराची जी श्रृंखला सातत्याने सुरु आहे, ती मोडीत काढणे म्हणजे मुक्ती होय. पुरुषांना व स्त्रीयांना समान हक्क आहेत. पण ही समानतेची 'मुक्ति' आपणांस फक्त कागदोपत्रीच दिसते. स्त्री ही जन्मापासून कुणाच्या ना कुणाच्या तरी अधिकारात वावरत असते. स्त्री सुशिक्षित झाली म्हणजे तिच्या बुध्दिला खाद्य मिळेल व ती समानतेसाठी भांडूही शकेल. त्याचप्रमाणे शिक्षणामुळे आर्थिक दृष्ट्याही स्वाबलंबी बनेल. त्यातूनच स्वावलंबनाची भावना स्त्रीमध्ये जागृत होऊन ती खंबीर बनण्यास मदत होईल. त्यामुळे स्त्री ही स्वत:ही मुक्ति घडवू शकते व सक्षम असू शकते. स्त्री वैचारिक दृष्ट्या ज्यावेळी स्वतंत्र होईल, खंबीर होईल, तीच खरी स्त्री मुक्ति ! महिलांसाठी दिलेल्या ५० टक्के आरक्षणामुळे अनेक ठिकाणी म्हणा जसे महानगर पालीका, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या हाती सत्ता आल्याचे दिसून येते. दिवसेंदिवस महिलांचा सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही सहभाग पाहता वावरही वाढत चाललेला आहे. भारताच्या राष्ट्रपती पदी आणि लोकसभेच्या अध्यक्षपदी, खासदार, आमदार, महापौर, सरपंच, नगरसेवक पदी, शिक्षण क्षेत्र असो वा क्रिडा असो, प्रत्येक क्षेत्रात महिला विराजमान व आघाडीवर आहेत. महिलांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अधिक सक्षमीकरण करण्यासाठी व उन्नतीसाठी महिलांना ५० टक्के आरक्षण दिल्यामुळे त्या आता सहज माणसाबरोबर भिडून उलट त्यांच्या पेक्षा जास्त कुवत निर्माण करण्यात सिंहाचा वाटा उचलत आहे, त्यामुळे त्यांच्या जगण्याचा स्तर नक्कीच वाढतो आहे, यात तिळमात्र शंका नाही. अशा वेळी महिलांना वंचित ठेवता कामा नये. त्यांनाही संधीचं सोनं करु दयायला पाहिजे. महिलांना आपली कुवत सिध्द करण्यासाठी थोडी 'स्पेस' द्यावी तरच समानतेचा प्रवास योग्य दिशेने होतोय असे ठाम पणे म्हणता येईल. स्त्री ही परिवाराचा कणा असून तिच्या शिवाय घर हे सुने असते. विकसित भारताचे स्वप्न साकार करावयाचे असेल तर आपल्याला स्त्रीला समाजात, कार्यक्षेत्रात योग्य तो सन्मान दिलाच पाहिजे. समान संधी व समान अधिकार या दोन्हीचा जागरुकतापूर्वक वर्तन व्यवहार पुरुषांकडुन होणे गरजेचे आहे.

वर्तमानपत्र हातात घेतल्यावर पहिल्याच पानावर रकानेचे रकाने वाचताक्षणी विचारांचे काहूर मनात थैमान घालतात, कारण महिलांवर बलात्कार, विनयभंग, खुन, अपहरण, लैंगिक अत्याचार दिवसें-दिवस वाढत आहेत. महिलांना असुरक्षितता सारख्या अशा अनेक समस्या भेडसावत आहेत. वीज, पाणी, बेराजगारी पेक्षा भयंकर अशी शोषण प्रणाली किळसवाणीच वाटायला लागली की कधी-कधी मनात सारखा विचार धुमसत असतो की, जे नराधम असे कृत्य करतात त्यांची त्याच ठिकाणी नांगी ठेचून संपवून टाकले पाहिजे. त्यानंतर उर्वरित कारवाई करावी. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत असे सुरुच राहणार आहे, निर्बंध नावाची वस्तुच दिसेनासी झाली आहे. तेव्हा महिला दिन कां म्हणुन साजरा करायचा ? असा अनाकलनीय प्रश्न सारखाच निर्माण होतो. याला कारणीभुत शासनच आहे, असे म्हणायला हरकत नाही. तेंव्हा आता तरी शासनाने कठोर व कणखर असे कायदे तयार करावेत जेणेकरुन महिलांच्या इभ्रतीस तडा जाणार नाही, याची दखल घ्यावी लागेल.

स्त्रीयांना परंपरागत गुलामगिरीतून काढून स्वातंत्र्य देण्याचे व तिचे उध्दार करण्याचे कार्य, भगवान बुध्द, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवांनी केले आहे, याला भारतीय इतिहासात तोड नाही. काळ जसा जसा पुढे सरकेल येणारी पिढी प्राचीन भारतातील गुलाम स्त्री व आधुनिक भारतातील स्वातंत्र्य स्त्रीयांचा तुलनात्मक अभ्यास करेल. तेव्हा संपूर्ण देश फुले-आंबेडकरांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्यापुढे झुकल्याशिवाय राहणार नाही, हे केवळ संविधानामुळेच हे तेवढेच खरे ! ८ मार्च महिला दिन तोंडावर असतांना लज्जास्पद गोष्टी समोर येत आहेत आणि आपण आदरासाठी भांडतो पण आपण जबाबदारीने वागतो कां ? याचा विचार प्रत्येक स्त्रीने करावा. आपला नवरा, आपली मुलं, सासु-सासरे, आई-वडील यांच्याकडे दुर्लक्ष करत किंवा त्यांना 'बाहेरुन ऑर्डर करा' असं सांगुन आपण खुशाल पार्ट्या करत हिंडत बसायचं यात कसलं आलंय स्त्रीत्व ? प्लीज यावर विचार कराअध्यात्माची जोड आयुष्यात द्या, त्यामुळे आपण एका वेगळया लेव्हलवर (समानतेवर) कायमच राहतो.

महत्वाचा मुद्दा इथे नमूद करावासा वाटतो तो म्हणजे, भटांमुळे विधवा स्त्रियांच्या वाटयाला येणारे अनेक अपमान, अत्याचार, नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांना कोणी वाली नसल्यामुळे मुस्कटदाबी व्हायची पुरुषाच्या वासनेत त्यांचा बळी जाणे अशा घटनांना विधवांना नित्य तोंड द्यावे लागत असे. त्यांच्यावर अत्याचार करणारे ही पुरुषच आणि त्यांना शिक्षा फर्मविणारे पुरुषच ! अशा अगतिक विधवांचा कोणी रक्षणकर्ता नसे. अशावेळी जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपल्या घरावर, विधवांनो इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा, तुम्ही आपले मुल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल अशी पाटी लावावी ही नाडलेल्या विधवांनी किती दिलासा देणारी गोष्ट, जी आजवर कोणीही करु शकले नाहीत ! धन्य ते फुले दाम्पत्य !

स्त्रीयांनी पुरुषांच्या अधिकाधिक स्वाधीन व्हावे. पुरुषांनी स्वच्छंदाने वागावे. शेवटी इथ पर्यंत मजल आली की, माझी स्त्री मी मेल्यावर दुसऱ्याकडे पाहिलं तर, त्यापेक्षा माझ्याबरोबर जळून जाईल तर बरे, यातच नावलौकिक आहेज्यात विधवेचे वपन करावे म्हणून लिहिले आहे, जो ग्रंथ (मनुस्मृती) जाळण्याच्या योग्यतेचाच नव्हे तर काय ? म्हणूनच तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करुन हा किळसवाना प्रकार थांबविण्याचा प्रयत्न केला. संसदेत हिंदू कोड बील सादर करतांना देखील या उच्चवर्णियांनी विरोध केला होता. म्हणून डॉ. आंबेडकरांना कायदेमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला, ही वस्तूस्थिती आहे.

स्त्री व पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषानं आयुष्यभर सुखात राहावं आणि दु:खाचा सगळा भार स्त्रीयांच्या खांदयावर टाकावा, ही सुख-दु:खाची विभागणी आजही अव्याहत सुरु आहे, ती संपली पाहिजे. माणुस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. कारण आजच्या काळातील स्त्री ही शिक्षणाने सक्षम झालेली आहे. पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबी नंतर स्त्रीने टोकाचं पाऊल उचलुन भरारी घेण्याचं ठरवलं आहे. आज ती शिक्षणापासुन राजकारणापर्यंतच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करुन कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीत आणि देशाचा नावलौकिक मिळविण्यात मोलाची भुमिका बजावत आहेत. कर्तबगार, कर्तव्यदक्ष, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर त्यांनी आपण कमी नसल्याचं वारंवार सिध्द केले आहे व आज ही करत आहे. आता स्वत:ची म्हणून एक स्वतंत्र वाट चोखाळून स्वातंत्र्यासाठी तिचा लढा आजही चालू आहे, अशा कर्तव्यदक्ष धाडसी वृत्तीच्या महिलांना जागतिक महिला दिना निमित्त मानाचा मुजरा !

***********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# केज तहसीलचा अनागोंदी कारभार! तारीख पे तारीख,या प्रकाराला वैतागून महिलेचा तहसील कार्यालयातच पेट्रोल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न!

केज/प्रतिनिधी महसूल प्रशासनाच्या दिरंगाई मुळे व निकाल देण्यासाठी तारीख पे तारीख या प्रकाराला वैतागून एका महिलेवर काल आत्मदहन करण्याची वेळ आली. या प्रकरणी महसूल प्रशासनातील बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासन कारवाई करणार का? तसेच केजच्या पत्रकारांना पोलिसांकडून हमेशा दुजाभाव केला जात असुन हा प्रकार नेमका कशासाठी आणि का? असा सवाल उपस्थित नागरिक व पत्रकारांतून करण्यात आला.

या बाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील वरपगाव येथील रहिवाशी असणाऱ्या दीपाताई पिता भानासुर देशमुख हल्ली मुक्काम लेक्चर कॉलनी मुखेड तालुका मुखेड जिल्हा नांदेड येथे आपल्या मुलीसह राहत आहेत. मुखेड येथे मोल मजुरी करून दीपाताई या त्यांचा व मुलीचा उदरनिर्वाह करत आहेत. केज तालुक्यातील वरपगाव येथील रुक्मिणीबाई भानासुर देशमुख या मयत असून त्या दीपाताई पिता भानासुर देशमुख यांच्या आई होत्या, वरपगाव येथे रुक्मिणीबाई देशमुख यांचे स.नं.५६/१,५७/१ मधील एकूण ५ एकर जमीन आहे. सदर जमिनीचा वाद हा गेल्या अनेक दिवसापासून सुरु आहे. उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई यांच्या न्यायालयात सदर प्रकरण चालले असून उपविभागीय अधिकारी यांनी सदर प्रकरणी दिनांक१७ जानेवारी २०२३ रोजी निकाल हा दीपाताई पिता भानासुर देशमुख यांच्या बाजूने दिला आहे. तसेच सदर प्रकरण हे माननीय केज न्यायालयात देखील न्यायप्रविष्ठ होते. सदर प्रकरणी माननीय केज न्यायालयाने दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी दीपाताई भानासुर देशमुख यांच्या बाजूने निकाल दिला आहे. वरील दोन्ही ही निकालाच्या आधारे सदर जमीनीचा फेर

> अजुनपर्यंत केजच्या तहसील कार्यालयात अग्नी शामक यंत्रच नाही! केज तहसील कार्यालयात अनेक महत्त्वाचे दस्तावेज असुन त्याच्या संरक्षणासाठी आणि काल घडलेल्या अशा आत्मदहनाच्या घटना अनेक वेळा या ठिकाणी घडत असतानाही यावर तहसील प्रशासन कोणतेही उपाय म्हणून या ठिकाणी अग्नी शामक यंत्र न ठेवल्यामुळे या ठिकाणी धोका दिसुन येत आहे.

हा दीपाताई पिता भानासुर देशमुख यांच्या नावे घेण्यासाठी तहसीलदार केज यांना आदेश देण्यात आले होते. असे माध्यमांशी बोलताना दीपाताई देशमुख यांनी म्हटले आहे. परंतु सदर प्रकरणी तलाठी व तहसीलदार आणि विरोधक यांनी संगणमत करून सदरचा फेरफार हा दीपाताई देशमुख यांच्या नावे करण्यासाठी टाळाटाळ केली आहे. सतत सदर प्रकरणी सुनावणी घेण्यासाठी तारखीवर तारीख देण्यात येत होती. असे माध्यमांशी बोलताना दीपाताई देशमुख यांनी आरोप केला आहे. सदर प्रकरणी दिनांक ६ मार्च २०२५ गुरुवार रोजी केज तहसीलदार यांच्या न्यायालयात दीपाताई देशमुख यांची सदर प्रकरणी तारीख होती. दीपाताई देशमुख या त्यांच्या मुलीसह तारखेला तहसील कार्यालय केज येथे हजर झाल्या होत्या. सदर प्रकरणी त्यांना न्याय मिळणे अपेक्षित होते.परंतु सदर प्रकरणी सुनावणी न घेता विरोधकाच्या म्हणण्यानुसार त्यांना पुढील तारीख देण्याचे आदेशित करण्यात आले होते. महसूल प्रशासनाकडून सतत होत असलेल्या दिरंगाईमुळे महसूल प्रशासनाच्या तारीख पे तारीख...तारीख पे तारीख...या प्रकाराला वैतागून अखेर दीपाताई देशमुख यांनी टोकाचे पाऊल उचलुन स्वतःच्या अंगावर तहसील कार्यालया मध्येच पेट्रोल ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न



केला. परंतु सदर प्रकार हा तहसील कार्यालयातील कर्मचारी व उपस्थित असलेल्या नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांना रोखण्यात आले. दीपाताई देशमुख यांनी तहसील कार्यालयाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या समोर स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून घेत असताना पेट्रोल त्यांच्या तोंडात व अंगावर आणि डोळ्यात गेल्याने जवळपास त्या एक तास बेशुद्धवस्थेत पडल्या होत्या. सदर घटनेची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील व काही पोलीस कर्मचारी तहसील कार्यालयामध्ये दाखल झाले. दीपाताई देशमुख या जवळपास एक तास तहसील कार्यालयाच्या एका बंद रूममध्ये बेशुद्ध अवस्थेत पडून होत्या परंतु त्यांना तात्काळ महसूल प्रशासनाच्या व पोलीस प्रशासनाच्या वतीने उपचारा कामी दवाखान्यात नेण्यात आले नाही.

दीपाताई देशमुख या त्या बंद रुममध्ये बेशुद्ध अवस्थेत असताना पोलीस प्रशासनाच्या व महसूल प्रशासनाच्या वतीने सदर रूमचा दरवाजा बंद करण्यात आला व त्या ठिकाणी सदरील घटनेचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना मज्जाव करण्यात आला.नागरिकांना व उपस्थित असलेल्या पत्रकारांना प्रवेश नाकारण्यात आला. हे नेमके कशासाठी हे प्रकरण मिडिया समोर उघड होवु द्यायचे नव्हते काय? असा प्रश्न नागरीकातुन उपस्थित केला जावु लागला आहे. तर याच वेळी बेशुद्ध पडलेल्या महिलेला शुद्धीवर आणण्यासाठी महसूल प्रशासनाचे कर्मचारी कार्यालयामध्ये कांदा व लिंबू शोधत होते दीपाताई यांना दवाखान्यात उपचार घेण्यासाठी तात्काळ दाखल करण्याची गरज असताना कांदा व लिंबू कशासाठी अशा चर्चा तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांतून ऐकण्यास मिळाली. तसेच महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाला सदर प्रकरण दाबायचे की,काय? असा सवाल उपस्थित नागरिकांतून केला जात होता. यावेळी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी महसूल प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोबाईल दूरध्वनी वरून संपर्क करून सदर प्रकरणाची माहिती दिल्यानंतर तहसीलदार राकेश गिड्डे कार्यालयात दाखल झाले. व सदर महिलेला उपचाराकामी उपजिल्हा रुग्णालय केज येथे दाखल करण्यात आले. सदर प्रकरणी अधिकृत माहिती ही महसूल प्रशासनाच्या वतीने अद्यापही देण्यात आली नाही. सदर माहिती ही प्राथमिक मिळालेल्या माहितीच्या अनुसार व दीपाताई देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे आहे.

## वनविभागाची कारवाई सागवानाची अवैध तस्करी करतांना रंगेहाथ पकडले

किनवट: शेख शौकत :-दि. ६ मार्च रोजी किनवट-सिरमेटी रोडवर पहाटे वन विभागाचे पथक गस्त घालत असतांना ५ आरोपी अंधारात डोक्यावर अवैध कटसाईज ५ सागी नग घेऊन येत असतांना वन विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडून गुन्हा नोंदविला आहे. वन विभागाला या कार्यवाहीत अनेक दिवसांपासून अवैद्यपणे सागवानाची तस्करी करणारी एक मोठी टोळी हाती लागली आहे.




आज दि. ६ मार्चच्या पहाटे अवैध सागवानाची तस्करी करणारी ही टोळी सागवानाचे अवैध नग डोक्यावरून घेत असल्याची गुप्त सूचना वनविभागाला मिळाल्यावर वनविभागाच्या पथकाने तात्काळ किनवट ते सिरमेटी या रस्त्यावर आपले गस्त वाया गस्तीदरम्यान समोरून डोक्यावर अवैध सागवानाचे चारपाठ मारलेले सागवानाचे नग डोक्यावरून घेऊन येत असतांना या ठोळीला मुद्देमालासह रंगेहाथ आपल्या सापळ्यात पकडले व वन गुन्हा नोंदविला. यात आरोपी नामे सिद्धार्थ भीमराव खिल्लारे रा. भीमपूर, संतोष किसनराव शिंदे रा. रामनगर, संभाजी सीताराम शिंदे रा. भीमपूर, प्रदीप माधव पेंदोर रा. भीमपूर आणि सद्गुरू दीपक आत्राम रा. भीमपूर ता. किनवट जि. नांदेड यांच्याकडून सागी नग ५ माल किंमत ४१६९ घ.मी. ०.१९७६ आहे. इतके अवैध सागवानाचे नग जप्त करून गुन्हा नोंदविला आहे. कार्यवाहीत उपवनसंरक्षक नांदेड केशव वाबळे सहाय्यक वनसंरक्षक जी.डी.गिरी वनपरिक्षेत्र अधिकारी पि एल राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीमंडळ अधिकारी एस एम कोंपलवार. एम एन कतुलवार वनरक्षक महेश भोरडे ओम शिंदे, कुलदीप मुळे तसेच वाहन चालक बाळकृष्ण आवले यांचा या कार्यवाहीत समावेश होता.

# विविध प्रलंबित मागण्यासाठी लातूरमध्ये बँक कर्मचाऱ्यांची तीव्र निदर्शने

लातूर - : मागील दोन वर्षापासून प्रत्येक राष्ट्रीयकृत बँकांमधून पुरेशा प्रमाणात नोकर भरतीची मागणी कर्मचारी संघटना करीत आहेत. यासाठी अनेक वेळा आंदोलनाचे वेगवेगळे कृती कार्यक्रम त्यांनी राबविले आहेत परंतु प्रत्येक राष्ट्रीयकृत बँकेचे व्यवस्थापन कुठल्याही बँकांमधून पुरेशी नोकर भरती करायला तयार नाही. तसेच ज्या काही जागा भरण्यात येत आहेत त्यातल्या बहुतांश जागा कंत्राटी भरती द्वारे भरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. याला सर्व संघटनांचा विरोध आहे. मार्च २०२४ मध्ये झालेल्या द्विपक्षीय करारानुसार सहा महिन्याच्या आत उर्वरित मुद्दे निकाली काढणे गरजेचे असताना सुद्धा केंद्र सरकार व आयबीए कडून पाच दिवसाचा आठवडा, जुनी पेन्शन योजना, यासारख्या कुठल्याही विषयावरती भूमिका घेतली जात नाही.मार्च महिन्यात दोन दिवसांचा संप बँक कर्मचाऱ्यांनी पुकारलेला आहे व त्यातून जर योग्य तो तोडगा निघाला नाही तर एप्रिल महिन्यात बँक कर्मचाऱ्यांना नाईलाजाने बेमुदत संपाकडे वाटचाल करावी लागेल असा इशारा यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड उत्तम होळीकर यांनी दिला.



जर सरकार बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या एकजुटीला गांभीर्याने घेत नसेल व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी टाळाटाळ करत असेल तर याचे गंभीर परिणाम बँकिंग व अर्थव्यवस्थेला सोसावे लागू शकतात हे सरकारने लक्षात घ्यायला हवे. कारण बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या एकजूटीमध्ये बँकिंग व अर्थव्यवस्थेची चाके थांबविण्याची ताकद अजूनही आहे हे सरकारने लक्षात घ्यावे.कामाचा वाढता भार पाहता वैयक्तिक आयुष्य व काम यामध्ये संतुलन करण्यासाठी पाच दिवसाच्या आठवड्याची आज नितांत गरज आहे. परंतु आयबीए कडून दरवेळी याबाबत टोलवाटोलवीची उत्तरे देण्यात येत आहेत. हा लढा फक्त या मुद्यांपुरताच मर्यादित नसून अनेक बँकांमध्ये सुरू असलेल्या एकाधिकारशाही विरोधात तसेच बँकांच्या संचालक मंडळामध्ये कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे, ठेवीदारांचे,शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व असावे यासारख्या अनेक धोरणांच्या मुद्द्याचा देखील आहे. कारण कोणत्याही बँकेचे धोरण काय असावे हे केवळ त्या बँकेचे चेअरमन यांना ठरविण्याचा अधिकार नसून बँकेतील सर्व घटकांच्या एकत्रित विचाराने बँकेचे धोरण ठरायला हवे. यासारख्या अनेक गोष्टी या आंदोलनाच्या पाठीमागे असल्याचेही कॉम्रेड होळीकर म्हणाले.

यावेळी उमेश आडगावकर, सचिन नंदागवळे, विवेक पदरे, राजेंद्र दरेकर, बालाजी बावलगे, आदित्य देशपांडे, स्वप्निल जाधव, भीमाशंकर उटगे, राधिका मुंदडा, श्यामला शुक्रे यासह लातूर शहर व परिसरातील ५० पेक्षा अधिक सभासद निदर्शनासाठी उपस्थित होते..

# सतीश भोसले ऊर्फ खोक्याच्या आकावर कारवाई करा

मुंबई : बीडमधील राजकीय गुन्हेगारी किती खोलवर रुजली आहे, यावरून राज्यात संतापाची लाट उसळली आहे. मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या कशा क्रूरपद्धतीने झाली, याचे फोटो आणि व्हीडीओ समोर येताच, संतापाची लाट उसळली.

यानंतर आता भाजपच्या पदाधिका-याने बॅटने केलेल्या मारहाणीचा प्रकार समोर येताच संतापाची पुन्हा लाट उसळली आहे. सतीश भोसले ऊर्फ खोक्या असे मारहाण करणा-याचे नाव असून तो भाजप आमदार सुरेश धस यांचा समर्थक असल्याचे सांगितले जाते. सतीशविरुद्ध गेल्या २४ तासांत दोन गुन्हे दाखल झाले असून तो पसार आहे. बीडच्या बावी इथल्या ढाकणे पिता-पुत्राला सतीश भोसले ऊर्फ खोक्या आणि त्याच्या इतर साथीदारांनी मारहाण केल्याची घटना १९ फेब्रुवारीला घडली होती. या प्रकरणात आता शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



झाला आहे.

सतीश भोसले आणि त्याच्या साथीदारांनी मारहाण केलेले ढाकणे कुटुंब प्रचंड दहशतीखाली असून आम्हाला पोलिस संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. बीडमधून काल अर्धनग्न अवस्थेतील एका व्यक्तीला जबर मारहाण केल्याचा व्हीडीओ समोर आला. मारहाण करणारा व्यक्ती हा सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याचे समोर आले. हा व्हीडीओ चुकीचा असून तो दोन वर्षांपूर्वीचा आहे. माझ्या मित्राच्या कुटुंबातील महिलेची छेड काढल्याने मी त्या ठिकाणी गेलो होतो असे स्पष्टीकरण सतीश भोसले यांनी दिलेलं आहे.

सतीश भोसलेविरुद्ध गेल्या २४ तासांत दोन गुन्हे दाखल झाले आहेत. तेव्हापासून तो पसार आहे. मात्र, त्याचे कारनामे समोर येऊ लागले आहेत. सतीश भोसले ऊर्फ खोक्याने हजारो मुक्या प्राण्यांचा जीव घेतला आहे, तसेच विरोध करणा-या माणसांना देखील अमानुष पद्धतीने मारहाण केली.

कार्यकर्ता असल्याची धस यांची कबुली

सतीश भोसले याच्या 'आका'वर कारवाई करावी, अशी मागणी देखील सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. दरम्यान या दोन्ही गुन्ह्याच्या प्रकरणात पोलिस सतीश भोसलेच्या शोधात आहेत. दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी सतीश भोसले हा आपला कार्यकर्ता असल्याची कबुली दिली आहे.

## सिताराम कांबळे यांचे वृध्दापकाळाने निधन

लातूर :- लातूरच्या बौध्द नगरातील राहिवाशी,आडतीवर निष्ठेने अनेक वर्षे कष्ट करणारे सिताराम परशुराम कांबळे(वय ९४ वर्षे) तथा दादा यांचे आज शुक्रवार,दि.७ मार्च २०२५ रोजी सकाळी राहत्या घरात वृध्दापकाळाने निधन झाले.सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्यांच्या पार्थीवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



गेली काही दिवसांपासून सीताराम कांबळे दादा हे वृध्दापकाळाने अंथरुणाला खिळून होते.आज सकाळीच त्यांची प्रणज्योत मालवली.सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास त्यांची बौध्द नगर येथील घरापासून अंत्ययात्रा निघाली.मारवाडी स्मशानभूमीत सायंकाळी त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.दि.११ मार्च रोजी सायंकाळी त्यांच्या निवासस्थानी जलदान विधी ठेवण्यात आला आहे.सामाजिक कार्यकर्ते कमलाकर कांबळे यांचे ते वडील आणि ॲड.गणेश कांबळे यांचे ते आजोबा होत.अंत्यसंस्कार समयी मोहनराव माने,अशोकराव कांबळे,बौध्दाचार्य केशव कांबळे,अशोक अग्रवाल,ॲड.लहु सुरवसे,ॲड.सुभेदार मादळे,ॲड. रोहित सोमवंशी,ॲड.यशवंत चव्हाण,ॲड.प्रशांत गायकवाड,ॲड.राजकुमार गंडले,ॲड.दिपक साठे,ॲड.संजय गंडले,साहित्यिक जी.जी.कांबळे, साहित्यिक मोहन कांबळे सेलूकर,शहाजी गायकवाड,राम कोरडे, मालू,अशोक सुतार,संतोष सुर्यवंशी,सुशील चिकटे,अनिल गायकवाड,राजा माने,बाळ होळीकर,श्रीहरी कांबळे यांच्यासह स्त्री-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात १० वर्षांत परकीय गुंतवणुकीचा विक्रम

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे अभिनंदन केले आहे. गेल्या दहा वर्षातील विक्रमी परकीय गुंतवणूक केवळ ९ महिन्यात महाराष्ट्रात आली असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, महायुती सरकारने आपलाच २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा विक्रम मोडला आहे. विशेष म्हणजे चालू आर्थिक वर्ष पूर्ण होण्यासाठी आणखी एक तिमाही बाकी आहे. त्या आधीच महाराष्ट्रामध्ये विक्रमी गुंतवणूक आली असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर आपल्या पोस्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्वात महाराष्ट्राची घोडदौड अशीच सुरू राहील असा विश्वास देखील व्यक्त केला आहे. गेल्या १० वर्षांतील विक्रमी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली केवळ ९ महिन्यात! केंद्र सरकारच्या डीपीआयआयटीने परकीय गुंतवणुकीचा डिसेंबर २०२४ अखेरचा अहवाल जाहीर केला असून, गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक वार्षिक परकीय गुंतवणूक ही अवघ्या ९ महिन्यात महाराष्ट्राने प्राप्त केली आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या ९ महिन्यात आतापर्यंत एकूण १,३९,४३४ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. ही गेल्या १० वर्षांत महाराष्ट्रात कोणत्याही एका वर्षात आलेल्या परकीय गुंतवणुकीपेक्षा सर्वाधिक आहे. असे करताना महायुती सरकारने आपलाच २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा विक्रम मोडला आहे.

अर्थात या आर्थिक वर्षातील एक तिमाही आणखी बाकी आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे पुन्हा एकदा मन:पूर्वक अभिनंदन! माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड ही अशीच कायम राहील.

# मुलीची छेड काढणा-यांना जाब विचारला म्हणून मारहाण

छ. संभाजीनगर : मुलीची छेड काढून त्याचा जाब विचारण्यास गेलेल्या कुटुंबीयांना लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आली. ही घटना वाळूज भागातील जोगेश्वरी येथे समोर आली. टोळक्याने बुधवारी सकाळी १४ वर्षांच्या मुलीची छेड काढली. मुलगी शाळेतून परत आल्यावर तिने कुटुंबीयांना हा प्रकार सांगितला तेव्हा पालक छेड काढणा-यांना जाब विचारायला गेले असता पालकांनाच मारहाण करण्यात आली. याप्रकरणी प्रतीक सतीश राजपूत, ऋषिकेश रामनाथ दुबिले, रोहित शंकरसिंग बहुरे, नीलेश रामनाथ दुबिले यांच्यावर एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना ताब्यात घेतले आहे. सकाळी पाच वाजेच्या सुमारास मुलगी आपल्या घराचा ओटा झाडत असताना



टोळक्याने तिची छेड काढली होती. तसेच त्यानंतर शाळेतून परत येत असताना टोळक्याने तिचा पाठलाग करून अश्लील हातवारे केले होते. यामुळे भयभीत झालेल्या मुलीने हा संपूर्ण प्रकार आपल्या घरी सांगितला. मुलीच्या आईला गंभीर जखमी केले हा सगळा संतापजनक प्रकार ऐकून कुटुंबीय टोळक्याला जाब विचारण्यासाठी गेले. त्या वेळी त्यांनी लाकडी दांडे, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात मुलीच्या आईला छातीवर लाथ व डोक्यात काहीतरी मारून जखमी केले. वडिलांनाही ते तिघे मारत असताना तेथे काही जण भांडण सोडवण्यास आले, तेव्हा त्या तिघांनाही हाताचापटाने मारहाण करून शिवीगाळ केली. याप्रकरणी परस्परविरोधी गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE